# कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर
# पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव , जि.अहमदनगर.

जा.क्र./ ऊस विकास/३४६२ दि.२४/०१/२०२०

## -- परिपत्रक --

### ---लागवड हंगाम २०१९-२०(गळीत हंगाम २०२०-२१)चे ऊस पिकासाठी ---

### --ठिबक जलसिंचन योजना--

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक ''अ'' वर्ग व''क'' वर्ग सभासदांना कळविणेत येते की,कार्यक्षेत्रात झालेला पाऊस व विहीरींची पाणी पातळी विचारात घेऊन उपलब्ध असलेल्या पाण्याचा काटकसरीने व योग्य वापर व्हावा यादृष्टीने ऊस पिकासाठी ठिबक जलसिंचन योजना राबविणे अनिवार्य झालेले आहे.त्याकरीता मा. संचालक मंडळाने लागवड हंगाम सन २०१९-२० चे ऊस पिकासाठी खालीलप्रमाणे ठिबक जलसिंचन योजना राबविण्यास मान्यता दिलेली आहे.

**अ) शासकिय अनुदानास पात्र(आयएसआय) ठिबक जलसिंचन संच .**

| अ.न | योजनेचा तपशिल | योजनेचे स्वरुप व आर्थिक सहभाग | |
|---|---|---|---|
| १ | अपेक्षित प्रती एकरी खर्च मर्यादा | ४-५ फुट लागवड पध्दत व जोड ओळ लागवड पध्दत | प्रती एकर रु.४५०००/- |
| २ | शेतकरी सहभाग | प्रती एकरी रोख रक्कम कारखान्याकडे भरणा करणे | प्रती एकर रु.१७०००/- |
| ३ | कारखाना सहभाग (अॅडव्हान्स) | लाभार्थीचे नावे टाकुन परस्पर ठिबक कंपनीस अदा करणेत येईल. | प्रती एकर रु.१००००/- |
| ४ | शासकीय अनुदान/ठिबक कंपनी क्रेडीट | अनुदान रक्कमे इतकी सवलत कंपनीमार्फत पाच महिन्यापर्यत शेतकऱ्यास देण्यात येईल अनुदान प्राप्त झाले नंतर ती संबधित कंपनीस लाभार्थी परस्पर आदा करील. | प्रती एकर रु.१८०००/- |
| ५ | लाभार्थी पात्रता | १ एकर ते २.५ एकर क्षेत्र मर्यादेपर्यत यापुर्वी ठिबक जलसिंचन योजनेचे व कारखान्याचे थकबाकीदार नसलेले सभासद शेतकरी. | |
| ६ | आवश्यक कागदपत्र (कारखाना,ठिबक कंपनी व शासकिय अनुदान प्राप्तीसाठी) | ठिबक संच मागणी अर्ज,पेंमेट कपातीचे संमती पत्र, ७/१२ , ८ अ उतारा,शासकिय अनुदान प्राप्तीसाठी रु.१००/-चे दोन स्टॅम्प, कारखाना करारनामासाठी रु.१००/-चा एक स्टॅम्प, राष्ट्रीयकृत बँकचे दोन सह्या असलेले धनादेश व पासबुक झेरॉक्स प्रत, ठिबक संचाचे कोटेशन,डिझाईन,महाराष्ट्र शासन कृषी कार्यालय याची पुर्व संमती,आधार कार्ड व दोन पासपोर्ट साईज फोटो. | |

मागील पानावर/-



Scanned by CamScanner

## ब) नॉन आयएसआय ठिबक जलसिंचन संच -

| अ.न | योजनेचा तपशिल | योजनेचे स्वरुप व रक्कम |
|---|---|---|
| १ | कारखाना सहभाग (संच खरेदी कामी अॅडव्हान्स) संच कार्यान्वीत झाल्यानंतर पाहणी व बिल प्राप्त झालेनंतर परस्पर पुरवठादार कंपनीस लाभार्थीच्या नावे टाकुन आदा करण्यात येईल. | प्रती एकरी रु.७०००/- |
| २ | आवश्यक कागदपत्र | ठिबक संच मागणी अर्ज,पेंमेट कपातीचे संमती पत्र, ७/१२ ,८अ उतारा कारखाना करारनामासाठी रु.१००/-चा एक स्टॅम्प,ठिबक संचाचे कोटेशन, डिझाईन,आधार कार्ड |

**योजनेच्या शर्ती व अटी---**

१) कारखान्याकडे ऊस नोंद असणे आवश्यक आहे.

२) अपेक्षित खर्चापेक्षा येणारा जास्तीचा खर्च शेतकऱ्यांने परस्पर ठिबक कंपनीस अदा करावयाचा आहे.

३) ठिबक जलसिंचन संचाचे अनुदानाबाबत जे शासकिय धोरण जाहीर होईल ते लाभार्थीस बंधनकारक राहिल कृषी विभागाकडून शासकिय अनुदान उपलब्धतेबाबत लाभार्थीने पुर्वमंजुरी पत्र घेणे आवश्यक राहील

४) शासकिय अनुदान प्राप्त करण्याची जबाबदारी लाभार्थी शेतकरी यांची राहील त्यास कारखाना जबाबदार राहणार नाही. प्राप्त झालेले अनुदान रक्कम ठिबक कंपनीस अदा करणे बंधनकारक राहील.त्याची लाभार्थीस अन्य विल्हेवाट करता येणार नाही.

५) रु.१८,०००/- कंपनी क्रेडीट पाच महिनेपर्यंत ठिबक संच उत्पादित कंपनीकडुन सवलत देण्यात येईल परंतु पाच महिन्याचे कालावधीत सदरची रक्कम कंपनीस आदा न झाल्यास त्या रक्कमेस सुरवातीपासुन १२% दराने व्याज आकारणी करण्यात येईल. सदर रक्कम व्याजसह कंपनीस शेतकऱ्यांने अदा करावयाची आहे.

६). कारखाना अॅडव्हान्स रक्कम लाभ धारकाचे ऊस बिलातून अग्रहक्काने सव्याज वसूल केली जाईल.

७) ठिबक संचाचे साहित्याची वाहतूक ही वितरकाचे दुकानापासून ते शेतापर्यंत लाभार्थी शेतक-याने स्वत: करावयाची आहे.संच जोडणी कंपनी मार्फत विनामुल्य करण्यात येईल.

८) नॉन आयएसआय ठिबक संचास शासकिय अनुदान मिळत नसल्यामुळे ठिबक संचाबाबत कारखाना अथवा ठिबक कंपनी कुठल्याही प्रकारची गॅरंटी/वॉरंटी घेणार नाही मात्र सदर संचाची लॅटरल १५ मिल किंवा कमीत कमी ०.४ एमएम जाडीची असणे आवश्यक आहे.

९). ठिबक सिंचन संचावर उत्पादित केलेला ऊस कोणत्याही कारणास्तव गळीतास न आल्यास कारखाना अॅडव्हान्स व इतर रक्कम उत्पादकाचे कुठल्याही देय पेमेंट मधून अथवा जामीनदाराचे देय पेमेंटमधून सव्याज वसूल केली जाईल

१०) कंपनीने दिलेल्या उधारीची रक्कम रु.१८०००/-ऊस गळीतास आलेनंतर १२ % व्याज दराने आकारणी सह नावे टाकुन कंपनीस वसुल करुन दिली जाईल.मात्र ऊस बिलातुन वसुल न झाल्यास १८ महिन्यानंतर त्यास १५%व्याजाच्या आकारणीसह नावे टाकुन कंपनीस आदा करण्यात येईल.

वरील ठिबक सिंचन योजनेच्या नियम व अटी या प्राथमिक स्वरूपाच्या असून त्यात बदल करणेचा अधिकार मा.संचालक मंडळाने राखून ठेवलेला आहे.योजनेत सहभागी ठिबक कंपन्या व योजनेच्या अधिक माहितीसाठी कारखान्याचे ऊस विकास कार्यालयाशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त ऊस लागवड ठिबक सिंचनाखाली घेण्यात यावी ही विनंती.

कळावे,

**आपला विश्वासु**
**गि.ज.जगताप**
**कार्यकारी संचालक**

Scanned by CamScanner